पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 14/01/2020 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत 10 कि.मी अंतरावर सिल्लेवाडा येथे दिनांक 13/01/2020 चे 11.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे- मोहम्मद सईद साबिर सैय्यद, वय 22 वर्ष, रा. हवामहल क्वा नं 150, शंभु हॉटेल, सिल्लेवाडा हा गंग्या सोनेकर यांचे घराजवळ पोहचला असता आरोपी नामे- अंकित गणेश प्रकाश यादव, वय 23 वर्ष, रा. सिल्लेवाडा वार्ड क्र. 4, युको बॅक जवळ याने फिर्यादीस शिवीगाळ केली. यानंतर आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने मारहाण करून फिर्यादीच्या खिश्यातुन 400/-रू. जबरीने काढुन हिसकावुन पळुन गेला. तसेच आरोपीने फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 392, 323, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक निमसडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर